पापाने रोमरोमात भिनलेल्या या राजयलक्ष्मीला तुम्ही अविनाशी समजता ? असले सुख तूम्हांसच लखलाभ असो. आता ही राज्यलक्ष्मी माझ्या भोगण्यायोग्य राहिली नाही. मी आता तपोलक्ष्मीचा स्वीकार करु इच्छितो . माझ्याकडून जो अपराध घडला असेल त्याबद्दल क्षमा करा. माझ्या मनाच्या चंचलतेने मला अतिशय दु:ख होत आहे.

बाहुबलीच्या या उदात्त विचाराने चक्रवर्तीच्या संताप्त ह्दयात प्रकाश पडला. त्यांचे ह्दय शांत झाले व केलेल्या दुष्कृत्याबद्दल ते पश्चाताप करु कागले. त्यांनी बाहुबलींची खूप मनधरणी केली. पण ते आपलया संकल्पापासून विचलित झाले. नाहित. महाबली नावाच्या पुत्राला राजयसिंहासनावर बसवून त्यांनी वनाचा मार्ग धरला. तपस्या करण्यास त्यांनी आरंभ केला सर्व परिग्रहांचा त्याग करुन एक वर्षाच्या प्रतिमायोग त्यांनी धारण केला. हळूहळू चारही बाजूंनी त्यांच्या अंगावर वेली चढू लागल्या. सर्पांनी त्यांच्या भोवती आपली वारुळे तयार केली वारुहातून निधूंन ते बाहुबलीच्या शरीरावर निर्भय होऊन फिरु लागले. तरी देखील बाहुबली आपल्या ध्यानापासून रतिभरदेखील ढळले नाहित. त्यांचे शरीर सुकले, कृशता आली. पण तेज मात्र वाढत गेले. त्यांच्या प्रभावाने वन देखील शान्त होत गेले. क्रुर प्राणी आपली क्रुरता विसरत चालले. त्यांच्या ह्दयातील अंधकार दूर होत चालला. सारे पशूपक्षी त्यांच्या पायाजवळ आपापसातील वैरभाव सोडून येऊन बसत

अशा प्रकारे अतिकठोर तपश्चर्या केली. पण बाहुबलींना केवलज्ञान झाले नाही. कारण त्यांच्या ह्दयात दु:खाचा एकच काटा सलत होता. माझ्यामुळे भरतेश्वरास अतिशय दु:ख भोगावे लागले. हाच विचार त्यांच्या ह्दयात व्यथित करीत असे. तप करीत असता एक वर्ष संपले. एक दिवस भरताने येऊन बाहुबलीची भक्तिभाने पूजा केली. भरतांना पूजा करीत असतांना पाहून बाहुबलीच्या ह्दयातील शल्य दूर झाले आणि त्यांना तत्काळ केवलज्ञान झाले. त्यानंतर नरश्रेष्ठ बाहुबली भगवान ऋषभदेवांच्या निवासाने पवित्र झालेल्या कैलास पर्वतावर जाऊन पोहोचले.

## 15

## भरताच्या राज्यातील

## सामाजिक व्यवस्था

सारा भारतवर्ष जिंकून भरत चक्रवर्ती राजधानीस परतले. आपणास मिळविलेल्या अपार संपत्तीकडे पाहून भरताच्या मनास चिंतेने घेरले. या धनाचा विनियोग कोणत्या प्रकाराचा परोपकार करण्यात करावा ? ते विचारु करु लागले - मोठया वैभवाने जिनेंद्र देवांची

महामहपूजा करुन साऱ्या जगाला धनदान देऊन संतुष्ट करावे अशी इच्छा आहे. पण निःस्पृह मुनि आमच्यापासून धन कसे घेतील ? कोणत्या मोठया व्यक्ती आहेत ? ज्यांनी अणुव्रत धारण केले, तेच गृहस्थ श्रेष्ठ होत. त्यांना इच्छित धनधान्य देऊन आदर-सत्कार करावा हेच योग्य होय.

असा निश्चय करुन भरतराजांनी योग्य पुरुषाचा सत्कार करावा या उद्देशाने राजे लोकांनी बोलाविले. त्यांना अशी सूचना दिली गेली की, राजे लोकांनी आपल्या सदाचारी इष्ट मित्र आणि सेवकांच्याबरोबर आमच्या उत्सवात पृथक् पृथक् यावे. चक्रवर्तीनी त्यांची परीक्षा पाहण्यासाठी आपल्या राजवाडयाच्या अंगणात हिरवीगार तृणांकुरे, फुले आणि फळे पसरविली. येणाऱ्या अतिथीमध्ये जे अव्रती होते ते विचार न करता त्या हिरव्या अंकुरांना तुडबीत राजमंदिरात घुसले. भरतांनी त्यांना एका बाजूस बसविले आणि इतर लोकांना बोलावून घेतले. परंतु आपला व्रतभंग होईल या भीतीने त्यांनी राजमंदिरात प्रवेश केला नाही् तेव्हा भरतांनी त्यांना याचे कारण विचारले, तेव्हा त्यांनी म्हटले आज पर्वाचा दिवस आहे. तेव्हा या हिरव्या तृणांकुरांना, पानांना, फुलांना तुडविता येत नाही. कारण भगवानांच्या तोंडून आम्ही असे ऐकले आहे की, त्यात अनन्त निगोदी जीव रहात असतात. आपल्या अगणात हिरवी पाने, फुले फळे वगैरे पसरल्याने त्यांना तुडवून आम्ही येऊ शकलो नाही. कृपया आपण गैरसमज करुन धेऊ नये.

त्यांचे हे उत्तर ऐकून भरतांना अतिशय आनंद वाटला. त्यांनी त्यांची स्तुती करुन सन्मानपूर्वक पुष्कळसे धन दान दिले. त्यांची ओळख पटावी म्हणून एकापासून ते अकरा संख्येच्या ब्रह्सूत्र नावाच्या सूत्रांनी त्यांना चिन्हित केले. अर्थात् एक ते अकरा प्रतिमा धारण केलेल्या पुरुषांनी क्रमांनी एक ते अकरापर्यत यज्ञोपवीते धारण केली. तद्नंतर त्यांना जिनपूजा, उपजीविका, दान स्वाध्याय, संयम वतप या षट्कर्माचा उपदेश दिला. त्यांनी म्हटले- द्विजांची हीच षट्कर्मे आहेत. जो यांचे पालन करीत नाही तो केवळ नावाचाच ब्राह्ण होय. गुणाने नव्हे तप, श्रुताभ्यास आणि जात हे तीनही ब्राह्ण होण्याची कारणे आहेत जो मनुष्य तप आणि श्रुताभ्यासाने रहित आहे तो केवळ जन्माने ( जाती ) ब्राह्ण होय. मनुष्यजात जरी कएच असली तरी आजीविकेच्या भेदामुळे भरतक्षेत्रात त्यांचे चार प्रकार मानले गेले आहेत. व्रतांच्या संस्काराने मनुष्य ब्राह्ण म्हणविला. जातो शस्त्र धारण करणाऱ्यास क्षत्रिय म्हटले जाते, न्यायाने धन मिळविणाऱ्यास वैश्य म्हणतात आणि हलकी कामे करणाऱ्या मानवांना शूद्र म्हटले जाते. जो एकदा गर्भापासून व दुसऱ्या वेळेसआचरणापासून उत्पन्न होतो, त्यास द्विज

( दोन वेळेस जन्म घेणारा ) म्हणतात. परंतु जो क्रियेने आणि मंत्रांनी रहित आहे. त्यास केवळ नामधारी ब्राह्ण ( द्विज ) समजावे.

तद्नंतर भरतांनी त्यांना द्विजाच्या क्रियांचा उपदेश दिला. त्यांनी म्हटले- क्रियेत 53 गर्भान्वय क्रिया आणि 48 दीक्षान्वय क्रिया आहेत. या क्रिया गर्भापासून मोक्षाला जाण्यापर्यंतच्या आहेत. यातील गर्भान्वय क्रिया जे जन्मानेच जैन द्विज आहेत, त्यांच्यासाठी होत आणि दीक्षान्वय क्रिया या इतर मिथ्या धर्माचा त्याग करुन जैन धर्माची दीक्षा घेणाऱ्या द्विजासाठी आहेत.

पत्नीने ऋतुस्नान केल्यानंतर जिनेन्द्र देवाची पूजा वगैरे पूर्वक गर्भाधान करण्यास आधन क्रिया म्हणतात. गर्भधानानंतर तिसऱ्या महिन्यात प्रीति नावाची क्रिया असते. यात देखील जिनेन्द्र देवाची पूजा केली जाते आणि दारावर मंगल कलश स्थापन केले जातात. पाचव्या महिन्यात सुप्रीती क्रिया केली जाते. यात देखील पूर्वीच्याप्रमाणे पूजा वगैरे केली. जाते सातव्या महिन्यात धृति क्रिया केली जाते. नवव्या महिन्यात मोद क्रिया करतात. त्यावेळी गर्भिणीच्या गर्भाच्या सुरक्षिततेसाठी कंकणसूत्र वगैरे बांधले जाते. प्रसूती झाल्यानंतर जो जातकर्म विधी केला जातो, त्यास प्रियोद्भव नावाची क्रिया म्हणतात. जन्मापासून बाराव्या दिवशी नाम कर्माची क्रिया असते त्या दिवशी पूजनविधिपूर्वक बालकांचे नाव ठेविले जाते. तदनंतर तीनचार महिन्याच्या शेवटी मंगल वाद्ये वाजवित मुलास घरातून बाहेर नेणे यास बहिर्यान क्रिया म्हणतात. त्यावेळी बालकास इतर आप्तगण धन वगैरे भेट देतात. बालक बसण्यायोग्य झाल्यानंतर त्यास उत्तम आसनावर बसविणे ही निषद्या क्रिया होय.

मूल सात आठ महिन्यांचे होताच जिनेन्द्रदेवांची पूजा करुन त्यास अन्न खाऊ घालणे ही अन्नप्राशन क्रिया होय. बालकास एक वर्ष पूर्ण होताच त्याचा वाढदिवस साजरा करणे यास व्युष्टि क्रिया म्हणतात. नंतर शुभ मुहूर्त पाहून जिनपूजापूर्वक मुलाचे केस काढण यास केशवाप क्रिया म्हणतात पाचव्या वर्षी बालकास अक्षराभ्यास सुरु करणे यास लिपिसंख्यान क्रिया म्हणतात. चौदावी उपनीति नावाची क्रिया आहे. ही आठव्या वर्षी केली जाते. यावेळी बालकाकडून प्रथमच जिनपूजा करवून घ्यावी. त्यानंतर त्यास व्रत देऊन कमरेस मुंजेची दोरी बांधावी पांढरे शुभ धोतर. शुभ्र उपरणे आणि यज्ञोपवीत घालून त्यास भिक्षा भोजन करवावे. तद्नंतर व्रतचर्या नावाच्या क्रियेत तो अणुव्रतांचा अंगीकार करतो आणि ब्रह्मचर्याश्रमात प्रवेश करुन विद्याध्ययन करु लागतो. शिक्षण पूर्ण होईपर्यंत तो पान खात नाही. अंजन ( काजळ ) लावून घेत नाही. केवळ शुद्ध पाण्याने दररोज स्नान करतो. जमिनीवर झोपतो व कोणाशी विशष सलगी करत नाही. प्रथम त्यास श्रावकाचार शिकवावा, तद्नंतर आध्यात्मशास्त्र

शिकवावे, यानंतर त्यास व्याकरण, न्याय अर्थशास्त्र वगैरेचा अभ्यास करु देण्यास परवानगी द्यावी ज्योतिष, छन्द, शकून आणि गणितशास्त्रांचा देखील विशेषप्रकारे अभ्यास करावा.

शिक्षण पूर्ण् होताच व्रताचरण नावाची क्रिया असते. या वेळी तो शिक्षण घेत असता स्वीकारलेल्या व्रतांचा त्याग करतो. परंतु मद्य मांस, मधु, पाच उदुम्बराची फळे आणि हिंसा वर्गरेचा त्याला जीवनभर त्याग करावा लागतो म्हणून ती व्रत तो पालन करीत राहतो. तद्नंतर जर तो क्षत्रिय असेल तर शस्त्र धारण करील व क्षत्रिय जातीचा नसला तरी देखील स्वसंरक्षणासाठी किंवा शोभेसाठी शस्त्र हाती घेईल. तद्नंतर त्याचा विवाह केला जातो. पवित्र स्थानी सिद्ध प्रतिमेच्या समोर अग्नोला साक्ष ठेवून वधुवरांचा विवाह करावा. विवाहानंतर वधूवरांनी ब्रहाचर्यपूर्वक तीर्थक्षेत्रांची वंदन करावी तीर्थयात्रेनंतर धरी परतल्यानंतर कंकण सोडावे आणि ऋतुलातच पुत्रप्राप्तीकारिता कामभोगाचे सेवन करावे.

विवाहानंतर देखील मातापित्याबरोबर राहिल्याने तो परतंत्र म्हणविला जातो. त्यास स्वतंत्र बनविण्यासाठी वर्णलाभ नावाची क्रिया सांगितली गेली आहे. पित्यांच्या आज्ञेने धन धान्य संपत्ती वगैरे घेऊन स्वतंत्र घरी राहून जेव्हा तो स्वत:ची उपजीविका करु लागतो तेव्हा त्यास वर्णलाभ क्रिया म्हणतात. ही क्रिया जिनेश्वरांच्या पूजनपूर्वक पंचासमक्ष केली जाते. मुलाचा पिता पंचासमोर पुत्रास धनधान्य अर्पण करुन म्हणतात कि, हे धनधान्य घेऊन तू आता स्वतंत्र रहा. तुला गृहस्थ धर्माचे पालन करीत राहिले पाहिजे मी जसे माझ्या पित्याकडून मिळालेल्या धनाने धर्म आणि यश मिळविले त्याच प्रकारे तू देखील यश आणि धर्माची प्राप्ती करुन घेतली पाहिजे.

या वर्णलाभानतर देवपूजा वगैरे षट्कर्मे करीत निर्दोष रीतीने उपजीविका करणे यास कुलचर्या म्हणतात तद्नंतर ज्यावेळी तो धर्मात दृढ राहात गृहस्थाचार्य पद प्राप्त करुन घेतो तेव्हा त्यास गृहीशिता क्रिया म्हणतात.

जेव्हा तो गृहस्थाचार्य आपल्या सुयोग्य पुत्रावर धराचा सर्व भार सोपवून शान्तिपूर्वक आपले जीवन धर्मकार्मात व्यतीत करतो. तेव्हा त्यास प्रशान्ति क्रिया म्हणतात तद्नंतर घराचा त्याग करण्यास तयार होणे यास गृहत्याग क्रिया म्हणतात गृहत्याग करताना आपल्या धनाचे तीन भाग करावेत. एक भाग धर्मकार्यात खर्च करावा. दुसरा भाग घर खर्चासाठी ठवावा आणि तिसरा भाग ज्येष्ठ पुत्राशिवाय इतर मुलामुलीना वाटून द्यावा ज्येष्ठ पुत्रावर धराचा सर्व कारभार सोपवावा आणि मुलींना देखील मुलांप्रमाणे समान वाटणी द्यावी दीक्षा घेतल्यानंतर प्रथम काही क्रिया केल्या जातात त्यांना दीक्षाद्य क्रिया म्हणतात. तद्नंतर साऱ्या परिग्रहांचा त्याग करुन

जिनदीक्षा पूर्वक दिगंबररुप धारण् करण्यास जिनरुपता क्रिया म्हणतात याप्रमाणे गर्भाधानापासून जिनदिक्षेपर्यतची ही गर्भान्वय क्रिया होय. या क्रिया केवळ सम्यक्दृष्टी कुलातच करण्यास उचित आहेत.

तदनंतर दीक्षान्वय क्रियांची माहिती त्यांनी सांगितली व्रते धारण करणे यास दीक्षा म्हणतात आणि दीक्षेशी सम्बधित असलेल्या क्रियांना दीक्षान्वय म्हणतात जेव्हा एखादा मिथ्यादृष्टी भव्य जीव सन्मार्ग ग्रहण करण्यास तयार होतो तेव्हा प्रथम अवतार क्रिया केली जाते. प्रथम तो भव्य पुरुष कोण्या मुनि अथवा गृहस्थाजवळ जाऊन विचारतो की, खरा निर्दोष धर्म कोणता ? कारण मला अन्य धर्म विचाराह वाटत नाहीत. तेव्हा मुनिराज त्यांना खऱ्या वीतराग धर्माचा उपदेश देतात. तो उपदेश ऐकून तो भव्य जीव मिथ्यामार्गाचा त्याग करुन सन्मार्गाचे ग्रहण करतो. त्यावेळी गुरु हाच पिता होय आणि तत्वज्ञान हाच गर्भ होय धर्मरुपी जन्मद्वारा तो पुरुष तत्वज्ञानरुपी गर्भात येतो. यामुळेच या क्रियेने नाव अवतार क्रिया असे ठेवले गेले आहे. ही क्रिया गर्भाधान क्रियेसमान समजली जाते, तद्नंतर तो भव्य जीव गुरुचणाना नमस्कार करुन विधिपूर्वक व्रत ग्रहण करतो. यास दुसरी वृत्तलाभ क्रिया म्हणतात यानंतर स्थानलाभ नावाची तिसरी क्रिया असते. या क्रियेचा विधी पुढीलप्रमाणे असतो जिनलयात पवित्र स्थानावर समवसरणाची रचना करुन त्याची पूजा करावी. पूजेनंतर आचार्य तया मनुष्यास जिनप्रतिमेसमोर बसवून पुन:पुन: त्याच्या मस्तकावर हात फिरवीत म्हणतात की ही तुझी श्रावकदीक्षा होय. या दीक्षेने तू पवित्र झालास तद्नंतर हा मंत्र तुझ्या सर्व पातकांपासून तुला मुक्त करो असे म्हणून त्यास पंचनमोकार मंत्राचा उपदेश द्यावा या स्थानलाभ अथवा श्रावक दीक्षेनंतर जेव्हा तो मनुष्य कुदेवाची पूजा करणे सोडून त्यास आपल्या घरातून निरोप देतो, तेव्हा गणग्रह क्रिया म्हणतात तद्नंतर तो मनुष्य जिनेन्द्रदेवाची पूजा करुन व उपवास धारण करुन द्वादशांग संबंधाचे ग्रंथप्रवचन ऐकतो, त्यास पूजाराध्य क्रिया म्हणतात. तद्नंतर तो आपल्या सहधर्मीयांसह चौदा पूर्वसंबाधी शास्त्रांचे श्रवण करतो. यास पुण्ययज्ञ क्रिया म्हणतात अशा प्रकारे जैन शास्त्रांचे अध्ययन संपल्यानंतर तो इतर मतांच्या शास्त्रंचा अभ्यास करतो. यास दृढचर्या क्रिया म्हटली जाते. पर्वदिवशी उपवास करुन रात्रीच्या वेळी प्रतिमायोग धारण करणे यास उपयोगिता क्रिया म्हटली जाते तद्नंतर अपनीति क्रिया असते. देवआणि गुरुंच्या साक्षीपूर्वक वेष, वृत्त आणि समयाचे विधिपूर्वक पालन करणे यास उपनीति क्रिया म्हणतात पांढरे वस्त्र आणि जानवे धारण करणे यास वेष म्हणतात आर्यपुरुषांना योग्य अशा षट्कर्मांना अनुसरुन अद्योग करणे वृत्त होय आणि जैन श्रावकाची दीक्षा घेणे यास समय म्हणतात.

तदनंतर त्याच्या गोत्र आणि जाती वगैरेमध्ये बदल होतो. उपनीती क्रियेनंतर उपासकाध्ययन ( श्रावकाचार ) चा उत्तम प्रकारे अभ्यास करुन व्रते वगैरे ग्रहण करणे यास व्रतचर्या क्रिया म्हणतात. विद्याश्ययनानंतर गुरुजवळ जाऊन पुनश्च आपली वस्त्रभूषणे धारण करणे यास व्रतावतरण क्रिया म्हणतात.

या सर्वाचा आशय असा आहे की, जसे गर्भान्वय क्रियेमध्ये बालकांना आठ वर्षानंतर ब्रह्यचर्यपूर्वक गुरुकुलात राहून विद्याध्ययन करण्याचा विधी दर्शविला आहे आणि विद्याध्ययन संपल्यानंतर तो विद्याध्ययनासाठी घेतलेल्या व्रतांचा त्याग करुन गृहस्थाश्रमात प्रवेश करतो ; तसेच नव्या धर्माचा अंगीकार करुन नीवन जन्म घेणारा गृहस्थ देखील उपनीती क्रियेपूर्वक विद्याध्ययन करुन पुनश्च आपला गृहस्थवेष धारण करतो. या व्रताचरण क्रियनंतर विवाह केला जातो. यात तो आपल्या पूर्वीच्या विवाहित पत्नीस श्राविकेची दीक्षा देऊन पुन्हा तिच्या बरोबर विधिपूर्वक विवाह करतो. तदनंतर वर्ण लाभ क्रिया केली जाते त्या क्रियेचा विधी पुढीलप्रमाणे आहे त्याने चार प्रमुख श्रावकांना बोलावून म्हणावे - मी श्रावधर्मांची दीक्षा घेतली आहे गृहस्थाच्या संपूर्ण धर्माचे मी पालन करीन दान देणे पूजन करणे ही कार्ये नित्य करीन. गुरुकृपेने मी नवीन जन्म धारण केला आहे आणि कुलपरंपरेने चालत आलेल्या आचार धर्माचा त्याग करुन मी सम्यक् आचारांचा स्वीकार केला आहे. व्रतसिद्धि करण्यासाठी मी उपनीति क्रिया केली आहे. आता मी सुविद्य झालो आहे. श्रावकाचाराचा मी अभ्यास केला आहे या साऱ्या क्रिया केल्यानंतरच मी आपली वस्त्राभूषणे धारण केली आहेत तसेच पत्नीस देखील श्रावकधर्माची दीक्षा देऊन तिच्या बरोबर विधिपूर्वक विवाह केला आहे, म्हणून आता आपण मला आपणा सर्वात सम्मिलित करुन घेण्याची कृपा करावी तद्नंतर श्रावकांनी त्यास म्हणावे, तुझे म्हणणे योग्यच आहे. तुझ्यासारखा दुसरा ब्राह्मण कोण आहे ? आपल्यासारखी माणसे न मिळाल्याने आम्हास मिथ्यादृष्टी पुरुषांबरोबर संबंध ठेवावा लागतो. असे म्हणून त्यांनी त्यांस वर्णलाभांनी युक्त करावे. असे केल्याने तो श्रावक इतर श्रावकांच्या श्रेणीत बसण्यास योग्य होतो. तद्नंतरच्या क्रिया प्रथम सांगितल्या गेलेल्या गर्भान्वय क्रियेप्रणाणेच होत.

अशा प्रकारे धार्मिक क्रियेत निपुण असलेल्या भरतांनी मांडलिक राजांच्या साक्षीपूर्वक उत्तम व्रते धारण करणाऱ्या मनुष्यांना उत्तम शिक्षण देऊन द्विज वर्णाची स्थापना केली.

## 16

## भरतेशांना पडलेल्या स्वप्नांची फले

एके दिवशी चक्रवर्ती भरतेशांनी कांही स्वप्न पाहिली त्याना ती वाईट फले देणारी आहेत असे वाटू लागले. त्या स्वप्नांना पाहून त्यांचे ह्दय खिन्न झाले. त्यांनी त्यांची यथाथ फले जाणण्यासाठी भगवान ऋषभदेवांकडे जाण्याचा विचार केला. शिवाय त्यांनी जी ब्राम्हण वर्णाची नीवन सृष्टी निर्माण केली होती त्याचे भगवंनांना निवेदन करावयाचे होसे. शिवाय भगवंताचे दर्शन धेऊन त्यांचा फार काळ लोटला होता म्हणून चक्रवर्ती, मांडलिक राजांबरोबर भगवंताची वन्दना करण्यासाठी निधाले .

दुरुनच समवसरणाकडे पाहून भरतानी नमस्कार केला. समवसरणास प्रदक्षिणा घालून त्यांनी आत प्रवेश केला व ते गन्धकुटीजवळ पोहोचले. भगवंतांना नमस्कार करुन त्यांनी विधिपूर्वक त्यांची स्तुती व पूजा केली. धर्मोपिदेश श्रवण केला तदनंतर त्यांनी भगवंताना म्हटले- भगवान ! आपण सांगितलेल्या उपासकाध्ययन सूत्रांना अनुसरुन वागणाऱ्या ब्राह्‌णांची मी एक नवीन सृष्टी निर्माण केली आहे. अकरा प्रतिमेच्या विभागाला अनुसरुन त्या व्रतांचे चिन्हस्वरुप अशी एक ते अकरापर्यंत त्यांना यज्ञोपवीते दिली गेली आहेत. आपण धर्माचे साक्षात् प्रणेते असताना मी हे कार्य केले. माझे हे कार्य उचित घडले वा अनुचित ? याचे स्पष्टीकरण करुन माझी शंका दूर करा. शिवाय आज रात्री मी सोळा स्वप्ने पाहिली ती स्वप्ने देखील मला अनिष्ट फल देणारी आहेत असे वाटत आहे. कृपया त्यांचीही फले मला सांगा.

भरताच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी जगद्‌गुरु भगवान तयार होताच सभेत शांतता पसरली आणि सारे श्रोते चित्रासारख स्तब्ध राहिले. भगवंतांनी म्हटले- हे वत्स ! धर्मात्मे ब्राह्‌णांचा तू जो आदरसत्कार केलास तो योग्यच होय. परंतु त्यात काही दोष आहेत. जोपर्यत चतुर्थकाल राहिल तोपर्यंत त्यांचे आचरण योग्यच राहिल. पुढे पच्चम कालात जातीच्या गर्वाने हे सदाचारापासून भ्रष्ट होतील. सन्मार्गाला विरोध करतोल. मद्यमांस वगैरेची त्यांना गोडी लागून अहिंसाधर्म दूषित करतील व हिंसा मार्गाचे पोषण करतील. त्यावेळी हे यज्ञोपवीत त्यांचे व्रतचिन्ह न राहता त्यांच्या पापाचे चिन्ह म्हणून राहिल. म्हणून जरी ब्राह्‌ण वर्ग काही कालांतराने अधोगामी मार्गांचे अनुसरण करणारा असला तरी देखील तो नष्ट करता कामा नये ; कारण आता तर ते धर्मात्मेच आहेत.

ब्राह्‌ण वर्गाच्या निर्मितीतील गुणदोष सांगून भगवान स्वप्नांची फले सांगू लागले- तू जी स्वप्ने पाहिली आहेस ती देखील पुढील काळात होणाऱ्या धर्मांचा ऱ्हासच सूचित करीत आहेत. तू स्वप्नात या पृथ्वीवर एकाकी विहार करुन पर्वताच्या शिखरावर चढलेले तेवीस सिंह पाहिलेस. त्याचे फल असे की महावीर स्वामीशिवाय इतर तेवीस तीर्थकराच्या वेळी या पृथ्वीवर

दुर्जनांची उत्पत्ति होणार नाही. दुसऱ्या स्वप्नात एकटया सिंह पाठोपाठ चालणारा हरिणांचा सूहतू पाहिलास. ते दृश्य महावीर स्वामींच्या काली परिग्रह धारण करणारे अनेक कुलिंगी साध निर्माण होतील, हे सुचवित आहे. तिसऱ्या स्वप्नात हत्तीचे ओझे उचलण्याने ज्याची पाठ झ ुकली आहे, असा घोडा तू पाहिलास यावरुन तू पंचमकाळात साधू निर्दोष तपाचे सारे गुण धारण करु शकणार नाहिस. काही मूल गुण व काही उत्तर गुण यांचे पालन करण्याची प्रतिज्ञा घेऊनही ते आळसाने त्यात प्रमाद करतील. काहीजण मूलगुणांचा मुळातच भंग करतील आणि काही त्या व्रतापासून उदा-सीन राहतील. चौथ्या स्वप्नात वाळलेली पाने खाणाऱ्या बकऱ्यांचा समूह तू पाहिलास, त्याचे फल भावी कालात मनुष्य सदाचार सोडून दुराचारी बनेल. हत्तीच्या खांद्यावर चढणारे माकड तू पाचव्या स्वप्नात पाहिलेस, ते स्वप्न पुढील कालात प्राचीन क्षत्रिय वंश नष्ट होऊन अकुलीन लोक पृथ्वीची रक्षा करतील हे सुचविते. सहाव्या स्वप्नात घुबडास त्रास देणारे कवळे पाहिलेस, ते दृश्य असे सुचविते की, आगामी काळात मनुष्य धर्माच्या इच्छेने जैन मुनीजवळ न जाता इतर मतांच्या साधूंजवळ जातील सातव्या स्वप्नात नाचणारी भूते पुढील काळात लोक व्यंतरांनाच देव मानून पूजा करतील असे सूचवितात. आठव्या स्वप्नात तू ज्यांचा मध्यभाग सुकलेला आहे आणि ज्याच्या चारही बाजुंनी पाणी भरलेले आहे, असा तलाव पाहिलास. यावरुन आगामी कालात आर्यखंडातून धर्म नष्ट होऊन तो जवळच्या म्लेंच्छ खंडातच राहिल हे स्पष्ट होते. नवव्या स्वप्नात धुळीने मलिन झालेल्या रत्नांचा ढीग तू पाहिलास. ते दृष्य पंचमकालात ऋद्धिधारी मुनी होणार नाहित याचे सूचक आहे. कुत्र्यास आदरसत्कारपूर्वक नवेद्य खाऊ घालीत असलेले तू दहाव्या स्वप्नात पाहिलेस ते दृश्य आगामी कालात अव्रती ब्राह्मण देखील गुणी पात्राप्रमाणे आदरसत्कारास पात्र होतील असे सुचविते. अकराव्या स्वप्नात जोंराने डरकाळी फोडणारा तरुण बैल तू पाहिलास. ते स्वप्न पुढील कालात लोक तारुण्यावस्थेतच मुनि-अवस्थेत टिकून राहतील, इतर अवस्थेत नाही हे सूचविते मेघाने आच्छदित चंद्रमा पाहिल्याने असे वाटते की, पंचकालात मुनीत अवधिज्ञान व मन:पर्ययज्ञ ाान उत्पन्न होणार नाही. दोन बैल मिळून मिसळून जाताना तू पाहिलेस, ते दृश्य पंचकालात मुनी लोक एक दुसऱ्याच्या आश्रयानेच राहतील. एकट विहार करु शकणार नाहित असे सुचविते. मेघाच्छादित सूर्य पाहिल्याने हे सुचित होते की, पंचकालात बहुतेक केवलज्ञानरुपी सूर्याचा उदय होणार नाही. सुकलेले वृक्ष पाहिल्याने आगामी काळात स्त्रीपुरुषांने चारित्र्ये नष्ट होईल असे वाटते. सोळाव्या स्वप्नात तू वाळलेली पाने पाहिलीस, त्याचा अर्थ असा की, भ्ांवी काळात महाऔषधी वृक्षांचा यरस नष्ट होऊन जाईल. या सर्व स्वप्नांची फले कालांतराने

मिळतील आताच नव्हे. एवढे भगवंतांनी सांगितल्या नंतर राजे भरत भगवंतांना पुनः पुन : नमस्कार करीत आपल्या नगरात परतले.

17

## क्षात्रधार्माचा उपदेश

जसा राजा तशी प्रजा हा नियम आहे. सम्राट भरत धर्भप्रेमी होते आणि धार्मिक लोकांचा ते सन्मान करीत असत. म्हणून त्यांच्या प्रजेचे देखील धर्मावर प्रेम होते. भरत हा धर्मात्मा आहे हे पाहून त्यांचे मांडलिक राजे देख्रील धार्मिक बनले.

प्रात:काली उठताच भरत धार्मिक पुरुषांबरोबर धर्मावर चर्चा करीत असत. तदनंतर आपल्या मंत्र्याबरोबर ते अर्थ आणि काम यांचा विचार करीत. तदनंतर देवगुरुंची पूजा करुन धर्मासनावर विराजमान होत आणि प्रजेच्या सदाचार आणि असदाचाराचा विचार करीत. तद्नंतर अधिकारी पुरुषांना योग्य आज्ञा देऊन राजदरबारात जात, तेथे उपस्थित असलेल्या काही मांडलिकांना दर्शन देऊन काहींशी हसून, काहीशी गप्पागोष्टी करुन, काहींचा मानसन्मान करुन, काहींना दान देऊन संतुष्ट करीत, भेट देऊन आलेल्या राजेलोकांचा आणि दूतांचा सन्मान करुन निरोप देत, जे कालाकार आपलया कलेचे प्रदर्शन करण्यासाठी येत त्यांना देखील मोठे बक्षीस देऊन संतुष्ट करीत. दरबारातील कामकाज आटोपल्यानंतर ते भोजन करीत. तदनंतर अन्त:पुरात ते विश्रांती घत. एक प्रहर दिवस शिल्लक असताना ते राजोद्यानात फिरायला जात आणि सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेत फिरत.

चक्रवर्ती भरत धर्मशास्त्र, अर्थशास्त्र आणि कामशास्त्राचे पडित होते. शिवाय ते हस्तपरीक्षा, अश्वपरीक्षा, आयुर्वेद, निमित्तशास्त्र, शकुनशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र यात देखली प्रवीण होते. कोणत्याही शास्त्रातील विद्वानांना त्यांना भेटून जात असता वाटे की, चक्रवर्ती हे त्या शास्त्रातील तज्ञच आहेत. ते लोकाचाराचे निर्माते होते आणि राजयाशास्त्रचे अधिष्ठाते होते. अशा प्रकारे त्यांच्यात लक्ष्मी व सरस्वतीचा अद्भूत संगम झाला होता.

एके दिवशी राजसभेत एकत्र जमलेल्या राजे लोकांना भरतांनी क्षात्र र्माचा उपदेश दिला. ते म्हणाले- हे क्षत्रिय श्रेष्ठ पुषषांनो अदिपुरुष भ्ंगवान ऋषभदेवांनी आपणां सर्वास पीडीतांचे रक्षण करण्यासाठी नेमले आहे. प्रजेचे हित पाहून न्यायाने वागणे हेच तुमचे पहिले कर्तव्य

होय. धर्मपूर्वक धन मिळविणे, त्याचे संरक्षण करणे वाढविण आणि त्याचे योग्य पात्र पाहून दान करणे म्हणजेच क्षत्रियाचे न्यायपूर्वक केलेले वर्तन होय. क्षत्रियापदाची प्राप्ती रत्नत्रयाच्या प्रभावाने होते. कारण रत्नत्रयानेच तीर्थकरपदाचा लाभ होतो आणि तीर्थकर केवळ क्षत्रियवंशातच जनमघेत असतात. म्हणून धर्ममार्गात स्वत: स्थिर राहून इतरानाही स्थिर ठेवणे हे प्रत्येक क्षत्रियाचे कर्तव्य आहे. क्षत्रियाने आपली बुद्धी आणि विचार कुमार्गापासून हटवून सन्मार्गासच लाविली पाहिजे राज्यासन म्हणजे काटेरी मुकुट होय, हे त्याच्या मनात बाणले पाहिजे.

मानसिक निराकुलतेसच सुख म्हणतात. परंतु राज्यकारभारात मानसिक व्यथा अधिक प्रमाणात असते राज्यामुळे सख्खे बंधू आणि पुत्र देखील शत्रू बनतात. नेहमी संशयी वातावरणात राहावे लागते. तेव्हा राज्यास योग्य असा उत्तराधिकारी मिळताच क्षत्रियाने राज्य सिंहासन सोडून परमार्थसाधन केले पाहिजे जे लोक राजयसंपत्तीस जन्मभर कवटाळून राहतात. त्याना ती राज्यलक्ष्मी सोडून जाते आणि राज्यलक्ष्मीपासून जे विरक्त बनले असतील त्यांच्या पाठीशी ती धाव घेते. पण राज्यास योग्य उत्त्राधिकारी मिळेपर्यत राजाने प्रजेचे पालन केलेच पाहिजे राजाने अति काठोर होऊ नये. कारण अतिशय कठोर दंड देणाऱ्या राजाचा प्रजा तिरस्कार करते. त्याने आपल्या सैनिकांशी एकरुप झाले पाहिजे. जखमी सैनिकांच्या सेवाशुश्रषेंकडे लक्ष पुरविले पाहिजे. अपंग , लुळे पांगळे बनलेल्या सेनिकांच्या पोटापाण्याचा प्रश्न राजाने त्यांना जन्मभर मदत करुन सोडविला पाहिजे. असे केल्याने सैन्य संतुष्ट राहिल. कोणी सैनिक अथवा अन्य राजपुरुष वारल्यास त्यांच्या जागी त्यांच्या पुत्रानांच नेमावे. असे केल्याने राजाच्या कृतज्ञतेने आकर्षित होऊन त्यांचे सैनिक प्रेमाने व निष्ठेने राजकार्य करीत राहतात. दारिद्रयाने अथवा अन्य पीडेने कोणी सेवक दु:खी काष्टी असल्यास त्याचे दु:ख ताबडोब दूर करावे कारण योग्यप्रकारे उपजीविका न झाल्याने सेवकांचे मन सेवेपासून विरक्त होते. उत्तम कार्यदक्ष सेवकांचा सत्कार करावा. जो राजा वीर पुरुषांचा यथायोग्य सत्कार करतो ते पुरुष त्या राजास सोडून कधी जात नाहित. आपलया सेवकांचे संरक्षण करणे हे देखील राजाचे आद्य कर्तव्य ठरते. देश समृद्ध बनावा म्हणून राजाने खूप शेती करवून ध्यावी आणि शेतकऱ्यांना उत्तम प्रकारचे बीबियाणे देऊन त्यांच्या कार्यात मदत करावी आणि त्यांच्याकडून धान्यरुपाने कर घेऊन त्याचा संग्रह करावा.

सर्व प्रजेस समान समजणे हे राजाचे प्रधान कर्तव्य होय. एखादा समाज स्वत:स श्रेष्ठ समजून राजास कर देत नसेल तर त्याचे श्रेष्ठत्व कशात आहे हे त्यांना विचारले पाहिजे ? केवळ

विशिष्ठ जातीत जन्मल्याने ती माणसे श्रेष्ठ ठरत नाहित हे त्यांना पटवून द्यावे काहीनी गुणांच्या अपेक्षेने स्वत:स श्रेष्ठ ठरविले तर त्यांना म्हणावे जे दयाहिन आहेत, धर्माच्या नावावर पशुवघ करतात आणि करवितात. मांस आणि मद्य खातात ते चार अक्षरे अधिक शिकल्याने गुणी होऊ शकत नाहित.

राजाने शक्यतो युद्धे टाळली पाहिजेत. युद्धात मानवसेहाराबरोबर अनेक वाईट प्रवृत्ती समाजात फैलावतात. युद्धाचा कधीच चांगला शेवट होत नाही. एखाद्या बलवान राजाने आपल्या राज्यावर चढाई केली तर अनुभवी पुरुषांबरोबर विचार विनिमय करुन त्यांच्याशी तह करावा. परंतु दुष्टांचा संहार करण्यासाठी त्याने नेहमी तत्पर रहावे. कारण दुष्टांचे दमन आणि शिष्टांचे पालन हा खरा क्षत्रियधर्म होय. जो राजा दंडनीय शत्रू आणि पुत्र या दोधांचे दमन करतो आणि कोणाचा पक्षपात करीत नाही तो अत्यंत लोकप्रिय राजा होतो.

अशा प्रकारे सम्राट भरताने क्षत्रियांना भगवांतांनी दाखविलेल्या मार्गाचे दिग्दर्शन देऊन राजधर्माचा उपदेश दिला.

## 18

## स्वयंवराच्या प्रथेस सुरुवात

त्यावेळी काशी देशातील वाराणशी नगरीत अकंप्मन राजा राज्य करीत होता. त्यास सुलोचना नावाची एक मुलगी होती. एकेदिवशी कुमारी सुलोचना फाल्गुन महिन्यातील अष्टान्हिक पर्वात उपवासपूर्वक जिनेंद्रदेवांची पूजा करुन पूजेतील शेषाक्षता घेऊन आपल्या पित्याजवळ गेली. राजा अकंप्मनाने उठून विनयपूर्वक तिने दिलेल्या शेषाक्षता घेऊन त्या आपल्या मस्तकी ठेविल्या आणि मुलीला निरोप दिला. त्यावेळी आपली मुलगी यौवनावस्थेत असलेली पाहून राजास तिच्या विवाहाची चिंता लागली. त्याने आपल्या मंत्र्यांना बोलावून म्हटले की, आमच्या कन्येला अनेक राजांनी मागणी घातली आहे, तेव्हा ती कोणास द्यावी हे सांगा ?

एका मंत्र्याने म्हटले, चक्रवर्ती भरताच्या अर्ककीर्ती नावाच्या मुलास आपली मुलगी द्यावी. असे केल्याने चक्रवर्तीबरोबर आपले संबंध प्रस्थापित होतील आणि इतर सारे राजे आपले मित्र होतील. हे ऐकून दुसऱ्या मंत्र्याने म्हटले, आपणापेक्षा श्रेष्ठ माणसाशी संबंध ठेवणे योग्य नव्हे. आपलया समान दर्जाच्या मुलासच कन्या द्यावी. कारण समान दर्जाच्या माणसाबरोबर संबंध ठेवणेच हितकर होय,

हे एकून तिसऱ्या मंत्र्याने म्हटले, भूमिगोचराबरोबर आपले संबंध पूर्वीपासूनच आहेत. आता आपण विद्याधराशी संबंध जोडल्यास उत्तम होईल. शेवटी चौथ्या मंत्र्यांने म्हटले या साऱ्या

गोष्टी शत्रूत्व निर्माण करणाऱ्या आहेत. विद्याधरास कन्या दिल्यास चक्रवर्तीस अतिशय वाईट वाटेल. तो असा विचार करील की, भूमिगोचरामध्ये संबंध ठेवण्यास त्यांच्या योग्य कोणी नव्हता की काय ? यापेक्षा सर्वात उत्तम उपाय म्हणजे स्वयंवर होय. कन्या स्वयंवरात ज्याला वरील त्यास आपली मुलगी द्यावी असे केल्याने कोणाशी विरोध येणार नाही आणि सर्वात प्रथम महाराजांकडून या प्रथेस आरंभ केल्याने भगवान ऋषभदेव आणि सम्राट भरताप्रमाणे संसारात आपली देखील प्रसिद्धी होईल.

हा मार्ग सर्वाना पसंत पडला. स्वयंवराची तयारी सुरु झाली. सर्व राजे लोकांना निमंत्रण पाठविले गेले. सुलोचनेच्या सौंदर्याने आकर्षित होऊन राजे लोक वाराणशी नगरीत जमू लागले. राजा अकंम्पनाने सर्वाचा यथायोग्य आदर सत्कार केला. त्यांना राहण्यास जागा दिली. आलेल्या राजांत सम्राट भरताचे जेष्ठ पुत्र अर्कक्रीर्ति आणि हस्तिनापूरचे राजे जयकुमार देखील होते. वाराणशी नगरी शृंगारली गेली. ठिकठिकाणी तोरणे बांधली. आकाशात पताका फडकू लागल्या. फुलांचा वर्षाव होऊ लागला आणि नगाऱ्यांच्या आवाजाने दशदिशा भरुन गेल्या.

शुभ मूहूर्तावर कन्येने राजमंदिरात प्रवेश केला. सोभाग्यवती स्त्रियांनी तिला घेरले होते. विद्वान ज्योतिषी तिच्याबरोबर होते. तिच्यापुढे नगारे वाजत चालले होते. विवाह मंडपात आल्यानंतर मुलीस सुवर्णाच्या आसनावर बसविले आणि शुद्ध जलांनी भरलेल्या कलशांनी तिचा अभिषेक केला. तिने नवीन वस्त्रभूषणे घालून मंदिरात प्रवेश केला आणि अर्हताची पूजा केली.

इकडे सारे राजे स्वयंवर मंडपात येऊन आपापल्या आसना वर स्थानापन्न झाले. शेवटी राजा अकंम्पनदेखील आपल्या राणी सुप्रभेसह तेथे आला. त्याच वेळी कंचुकीबरोबर कन्येने स्वयंवर मंडपात प्रवेश केला. एका शृंगारलेल्या रथात ती बसली होती रथाच्या चारी बाजूंनी तिचा भाऊ हेमांगद आपल्या छोटया बंधूबरोबर सेनेसहित चालला होता. कंचुकीने विद्याधर राजेलोकांकडे रथ नेला. त्या राजांची तो ओळख करुन देऊ लागला रथ विद्यावर राजांकडून हळूहळू भूमिगोचर राजांकडे गेला. कंचुकी प्रत्येकाचे नाव सांगून प्रत्येकाचा परिचय करुन देत होता.

वसंतऋतूत कोकिळा जशी इतर वृक्षांचा त्याग करुन आम्र वृक्षाकडे जाते तशीच सुलोचनादेखील अर्कक्रीर्ती वगैरेना सोडून जयकुमाराजवळ जाऊन पोहोचली. चतुर कुंचुकीने तिचे मनोभाव जाणले. त्याने ताबडतोब रथ थांबविला. आणि जयकुमारांच्या गुणांचे वर्णन करण्यास प्रारंभ केला. हे, महाराज सोमप्रभ राजाचे पुत्र जयकुमार होत. यांनी उत्तर

भरतक्षेत्रातील मेघकुमारांना जिंकून सिंहनाद केला. होता तेव्हा चक्रवर्ती भरतांनी यांच्या वीरतेवर प्रसन्न होऊन यांना आपला वीरपट्ट बांधला होता आणि मेधेश्वर अशी पदवी दिली.

जयकुमाराच्या सुंदर आकृतीने आणि गुणांनी आकर्षित होऊन सुलोचना रथाखाली उतरली. तिने कंचुकीच्या हातातून वरमाला घेऊन जयकुमाराच्या गळ्यात घातली. ताबडतोब मंगल वाद्यांचा मधुरध्वनि दशदिशेस घुमला. इतर राजांचे चेहरे उतरले राजा अकंपनाने राजे जयकुमार आणि सुलोचनेस पुढे करुन नगरात प्रवेश केला.

राजकुमार अर्ककीर्तीच्या एका सेवकास जयकुमारांचा हा उत्कर्ष सहन झाला नाही. तेव्हा त्याने सर्व राजे लोकांना भडकावून देण्यासाठी म्हटले, हा अकंपन राजा फार दुष्ट आहे. याने आपणास व्यर्थच त्रास दिला. आपल्यासारख्या लोकांचा अपमान करण्यासाठीच त्याने व्यूह रचला होता आणि प्रथम ठरल्याप्रमाणे जयकुमारांच्या गळ्यात वरमाला घालायला लाविली आहे.

इतर राजे लोकांना उत्तेजित करुन तो सेवक आपल्या अर्ककीर्ती राजाजवळ गेला. त्याने म्हटले, षट्खंडात उत्पन्न होणाऱ्या रत्नांचे केवळ दोघेच मालक होऊ शकतात. एक तुम्ही आणि दुसरे तुमचे पिता. सर्व रत्नांत कन्यारत्नच श्रेष्ठ होय आणि त्या कन्यामध्ये सुलोचना सर्वांगसुंदर असल्याने सर्वश्रेष्ठ ठरते. राजा अकंपन फार दुष्ट आहे. त्याने तुम्हाला धरी बोलावून तुमचा अपमान केला आहे. कुठे तो साधारण जयकुमार आणि कुठे आपण सर्वश्रेष्ठ चक्रवर्तीचे पुत्र अर्ककीर्ती. मी हा अपमान सहन करु शकत नाही. जेथे एक साधारण मनुष्यदेखील आपला मानभंग झालेला सहन करु शकत नाही. तेथे आपल्यासारखा तेजस्वी पुरुष स्त्रीसाठी झालेला मानभंग कसा सहन करु शकेल ? तेव्हा आता मला आज्ञा द्या आपली आज्ञा मिळताच राजा अकंपनाला यमराजाच्या धरी पाठवून त्याच्या कन्येला वरमालेसह घेऊन येतो.

प्रथमच पराभवाने अर्ककीर्ती अतिशय खजील झाला होता. त्यात सेवकाचे मर्मभेदक बोलणे ऐकून तो क्रोधाने अतिशय संतप्त झाला. आगीच्या ज्वाळा ओकाव्यात तसा तो बोलू लागला, - ज्या दृष्टीने आपली कन्या दुसऱ्यास देऊन माझा अपमान केला आहे, त्याचा मृत्यूक्षण जवळ आलेला दिसतो. मूख अकंपन, नावाचाच अकंपन राजा आहे. मी क्रोधाविष्ट होताच सारी पृथ्वी कापू लागते, हे त्यास माहित नाही काय ? आज सोमवंश आणि नाथवंशरुपी जंगल माझ्या क्रोधरुपी अग्नीने जळून भस्म होऊन जाईल. माझ्या वडीलांनी जयकुमारांना वीरपट्ट बांधतांना त्यांच्या भयाने त्या वेळी मी ते सहन केल परंतु आज हा अपमान मी सहन करु शकत नाही. आज मी युद्धात जयकुमारास त्याचे वीरत्व किती आहे हे दाखवून देईन.

चक्रवर्तीचा मुलगा मर्यादेचे उल्लंघन करीत आहे हे पाहून मंत्री स्वस्थ राहू शकला नाही. त्याने म्हटले - तुमचे पितामह ( आजोबा ) भगवान ऋषभदेवांनी अर्पण केलेल्या पृथ्वीचे पालन तुमचे पिता राजे भरत करीत आहेत. त्यानंतर ती जबाबदारी आपणावर पडल. म्हणून या पृथ्वीवर जर कोणावर संकट येत येत असेल तर ते आपलेच संकट आहे असे समजून त्याचे निवारण करण्याचा प्रयत्न करावा. संकटापासून रक्षण करणाऱ्यासच क्षत्रिय म्हणतात. आता सम्राट भरतेश सर्वाची रक्षा करतात म्हणून ते सर्वात श्रेष्ठ क्षत्रिय होत. आपण त्यांचे जेष्ठ पुत्र असल्याने आपण सर्वात मोठे क्षत्रिय आहात. जेव्हा एका कन्येस अनेक पुरुष मागणी घालतात, तेव्हा परस्परातील विरोध दूर करण्यासाठी विद्धानांनी या सवेश्रेष्ठ स्वयंवरविधीचे विधान सांगितले आहे.

कुलीन पुरुषातील कोण्या एका पुरुषात आपल्या इच्छेनुसार कन्या पती म्हणून निवडते. मग तो पुरुष सौन्दर्यवान असो वा कुरुप , गुणी असो वा दुर्गुणी, धनवान असो वा दरिद्री, इतर लोकांनी त्यात अडचणी आणू नयेत, हाच न्याय आहे. जर कोणी या नियमाचा भंग करीत असेल, तर त्यास परावृत्त केले पाहिजे यासाठी आपण जे करीत आहात ते योग्य नव्हे. आपले पिता अकंपन राजांना भगवान ऋषभदेवांप्रमाणे मानतात. म्हणून तुम्ही देखील त्यांच्याशी नम्रतेने व आदराने व्यवहार करावा. तसेच दिग्विजयाच्या वेळी जयकुमारने जे पौरुष दाखविले होते, त्याचा आपण योग्य आदर बाळगला पाहिजे. जया योद्धयात शौर्यवीर्यांत्व आहे, त्याचा राजाने सन्मान केला पाहिजे व मग ज्याचा पराक्रम प्रथमच पाहून चुकलेले आहात, त्याच्याबद्दल तुम्हांस काय सांगावे ? चक्रवर्तीनंतर ज्या वेळी चक्र व रत्नांच्या सहाय्याशिवाय या पृथ्वीचे पालन करु लागला. त्यावेळी जयकुमाराशिवाय आपणास तारणारा कोणी नाही. म्हणून राज्यलक्ष्मीच्या साक्षात् दोन भुजांप्रमाणे असणाऱ्या सोमवंश आणि नाथवंशाचा नाश करण्यास निघणे हानिकारक होय. आज तूम्हास तीन पुरुषार्थाची प्राप्ती झाली आहे. अशा वेळी आता न्यायमार्गाचा त्याग करुन त्या प्राप्त पुरुषार्थाचा नाश करण्यास का सिद्ध होत आहात ! हाच जयकुमार दिग्विजयाच्या वेळी तुमच्या वडिलांचा सेनापती होता. त्याच्याशी युद्ध करुन आपण पतनमार्गाला जाऊ इच्छीत आहात ! बळजबरीने कन्येचे हरण केलेत तरी देखील ती तुमची होणार नाही. मग व्यर्थ का बरे परस्त्रीची अभिलाषा मनात धरुन आपल्या उज्वल कीर्तीला कलंक लावीत आहात ! सुलोचनेशिवाय इतर पुष्कळ कन्यारत्ने आहेत. त्या साऱ्या कन्या मी आपणांस अर्पण करवितो.

बुद्धिमान मंत्र्याच्या युक्तिपूर्ण बोलण्याची दुर्बुध्द अर्क्कीर्तीवर उलटाच परिणाम घडला. त्याने म्हटले, राजा अकंपनाचा दर्जा आमच्या बरोबरीचा आहे, हे मी मान्य करतो. पण त्यांनी प्रथमपासून जयकुमांरासच मुलगी देण्याचे जे कपटनाटक रचले आहे त्याचे निराकरण मी न केल्यास कल्पकालपर्यंत त्याचे निराकरण होऊ शकणार नाही. या अन्यायाचे परिमार्जन करण्याचे चक्रवर्ती देखील आनंदितच होतील कारण त्यांना देखील अन्यास सहन करणे योग्य वाटणार नाही. आणि या जयकुमारास देखील फार गर्व चढला आहे. सारे राजे त्याच्या विरोधी आहेत. तेव्हा त्याचा मानभंग करुन मी इतर राजांच्या प्रेमादरास पात्र होईन. मला सुलोचनेची आशा नाही. कारण जयकुमारास ठार मारल्यानंतर ती विधवा होईल. तेव्हा तिच्याशी माझे काहीच प्रयोजन राहणार नाही.

म्हणून मी असे केल्याने माझी अपकीर्ती न होता उलट कीर्तीत भरच पडेल. मी जर या अन्यायाचा प्रतिकार केला नाही तर माझी खरोखर अपकीर्ती होईल म्हणून आपण स्वस्थ रहावे.

मंत्र्यास अर्क्कीर्तीने असे उत्तर देऊन आपल्या सेनापतीस बोलाविले आणि युद्धाचा निश्चय करुन रणभेरीचा भीषण ध्वनी काढावयास लावला. महाराज अकंपनास ही बातमी समजताच ते अतिशय घाबरले त्यांनी आपल्या मंत्र्याबरोबर आणि जयकुमाराबरोबर विचारविनिमय करुन अर्क्कीर्तीकडे एक दूत पाठविला. परंतु दूतास निराशेने परतावे लागले. येणाऱ्या संकटानी अकंपनाच्या मनास विचलित केले. पण जयकुमाराने त्यांची समजूत काढली आणि म्हटले, चिंता करु नका. न्यायाचे उल्लंधन त्यांच्याकडून प्रथम झाले आहे. तेव्हा चिंता सोडून आपण सुलोचनेचे संरक्षण करा. मी देखील अर्क्कीर्तीस मर्कटाप्रमाणे बांधून आणतो. असे बोलून जयकुमार आपली सेना घेऊन यद्धास निघाला. ते पाहून राजा अकंपनही सुलोचनेस तिच्या मातेजवळ देऊन युद्धार्थ निघाला. दोन्ही बाजूंच्या सैन्यात घनघोर युद्ध झाले. पण कोणी कोणास जिंकू शकले नाही. तेव्हा जयकुमाराने आपला हत्ती अर्क्कीर्तीकडे वळविला आणि त्यास म्हटले, कुमार ! बुद्धिमान होऊन देखील आपण हे कसले दुष्कृत्य आरंभलेत ? काही दुष्टांनी आपल्या मनात विषाचे बी पेरलेले दिसते हे योग्य नव्हे. आपले व आमचे हे युद्ध आजच बंद झ ाले पाहिजे. आपण करीत असलेल्या या अन्यायाने आपली अपकीर्ती होईल आणि हे ऐकून सम्राट भरतेश्वरांना देखील खेद होईल.

परंतु अर्क्कीर्तीने त्यांचे विलकुल ऐकले नाही. तेव्हा जयकुमाराने युद्ध करावे म्हणून अर्क्कीर्तीच्या सैन्यास चोहीबाजूंनी घेरले. तोच सूर्यास्त झाला. तेव्हा दोन्ही सैन्यातील मंत्र्यांनी रात्री युद्ध करणे अधर्माचे आहे असे सांगून युद्ध बंद करावयास लावले.

दुसऱ्या दिवशी भीषण युद्ध झाले. जयकुमारने अर्क्कीर्तीवर देवदत्त बाणांचा प्रयोग केला. त्यामुळे अर्क्कीर्तीचा रथ नष्ट झाला. सारथी ठार मारला गेला आणि तो निःशस्त्र उभा राहिला, हे पाहून जयकुमारांनी त्यास ताबडतोब पकडून आपल्या रथात आणून ठेवले. अर्क्कीर्तीस पकडताच सारी सेना पळाली. युद्ध शांत झाले. राजा अकंपनाने तद्नंतर जयकुमार आणि अर्क्कीर्ती यांच्या मधले वैमनस्य नाहिसे केले. अर्क्मीर्तीबरोबर आपल्या छोटया मुलीचा विवाह करुन त्याने त्यास सन्मानाने निरोप दिला. पुष्कळशी भेट देऊन एका चतुर दूतास त्यानी चक्रवर्तीकडे पाठविले आणि तयास असे सांगितले की, चक्रवर्तीना येथे घडलेली घटना सांगून चक्रवर्तीचा आमच्यावर कोप होवू नये. असा प्रयत्न करावा.

दूत अयोध्येस पोहोचला. राजदरबारात जाताच त्याने भरतास प्रणाम केला. त्यांना भेट देऊन येथे घडलेली घटना सांगितली व राजा अकंपनातर्फे त्याने क्षमा मागितली. चक्रवर्तीने दूतास आदराने बोलाविले. आणि आपणाजवळ बसवून घेतले. त्यांनी म्हटले, महाराज, अकंपनानी तुम्हास पाठवून असा निरोप का दिला ? ते तर आम्हास पितृतुल्य आहेत. कदाचित अन्यायास प्रवृत्त झालो तर मला देखील तसे न करु देण्याचा त्यांना अधिकार आहे. मला हे चक्रवर्तित्व चक्ररत्नाने मिळाले नाही, सैन्याने देखील मिळाले नाही आणि पुत्रांनी देखील मिळ्वून दिले नाही. मला चक्रवर्तीपदाची प्राप्ती होण्यास जयकुमाराचे सहाय्य कारणीभूत झाले आहे. त्यांनेच म्लेच्छ राजांना जिंकून पर्वतावर माझ्या विजयाचा इतिहास कोरला आहे. अर्क्कीर्तीने तर माझ्या या कीर्तीवर काळीमा फासला. तो अर्क्कीर्ती नसून साक्षात् अयशकीर्तीच होय. आपण त्या गर्विष्ठास मुलगी देऊन फार वाईट कार्य केले. लोक म्हणतील की, आपल्या पुत्राने अपराध केला. असता देखील चक्रवर्तीने त्यास दंड दिला नाही. महाराज अकम्पनांनी माझ्या या अपयशास स्थायी स्वरुप दिले आहे.

महाराज भरताचे हे न्यायपूर्ण बोलणे ऐकून दूताला आनन्द वाटला. त्याने चक्रवर्तीना साष्टांग प्रणिपात केला आणि ताबडतोब वाराणसी नगरीस पोहोचून त्यांनी आपल्या राजास ती आनंदाची बातमी सांगितली. चक्रवर्तीच्या भयाने राजा अकम्पन आणि जयकुमार यांचे कोमेजलेले चेहरे कमलफुलाप्रमाणे फुलले. दोधांनी दूतांचा सन्मान करुन संतुष्ट केले. यानंतर जयकुमार सुलोचनेसह मोठया वैभवाने आपल्या राजधानीस हस्तीनापुरास गेला. तेथे त्याने तिच्यासह दीर्धकालपर्यंत पंचेद्रिय सुखाचा अनुभव घेतला.

एके वेळी सौधर्मेद्राने जयकुमार व सुलोचनेच्या शीलव्रतांची देवसभेत प्रशंसा केली. त्यावेळी तेथील रविप्रभ देवाने दोघांच्या शीलव्रतांची परीक्षा केली. ते आपल्या व्रतात दृढ आहेत असे

आढळून आले. तेव्हा त्याला मोठा आनंद झाला. त्याने त्यांना रत्नजडित वस्त्रालंकार अर्पण करुन मोठा सन्मान केला.

एके वेळी जयकुमाराला वैराग्य झाले. त्याने आपल्या शिवंकर महाराणीच्या अनंतवीर्य पुत्राला राज्य दिले व आदि भगवंताकडे जाऊन दीक्षा देण्याची त्यांना विनंती केली. समवसरणात भरत चक्रवर्तीही आले होते. त्यांचीही त्याने आज्ञा घेतली व तो आपल्या विजय, जयंत, संजयंत आदि चौदा भावासह दीक्षा घेऊन तपश्चरण करु लागला. उत्कृष्ट संयमामुळे त्याला सात प्रकाराच्या ऋद्धि व मन:पर्ययज्ञानाची प्राप्ती झाली. तो आदि भगवंताचा 71 वा गणधर झाला. त्यावेळी आदि भगवंतांना हात जोडून पुन: धर्मोपदेश देण्याची भरताने विनंती केली असता त्यांनी याप्रमाणे धर्मोपदेश केला-

आपण सारे शक्तिमान आहात, निकटभव्य आहात आगमाचे ज्ञाते आहात. तेव्हा रोष, दु:ख, वृद्धत्व आणि मृत्यू व पापांनी भरलेल्या या संसाराचा त्याग करण्याचा प्रयत्न करा. गृहस्थाश्रम सोडून गुप्ति, समिती, धर्म, अनुप्रेक्षा परीषहजय आणि चारित्राचा उत्तम तऱ्हेने अभ्यास करा. हेच तुम्हाला या संसारजालातून सोडवू शकतील गृहस्थाश्रम सोडू न शकणाऱ्या गृहस्थांनी संतोषपूर्वक आपले जीवन व्यतीत करावे. जीवनाला आवश्यक असेल तेवढाच उद्योग करावा, आवश्यक तेवढा परिग्रह ठेवावा. दानी बनावे, शीलवान बनून इंद्रियांना जिंकावे इंद्रियाचे दास बनू नका. आत्मकल्याण हेच आपले ध्येय आहे इतर साऱ्या गोष्टी त्याज्य होत, सारा श्रोतूवर्ग चातकाप्रमाणे हे अमृताचे थेंब प्राशन करीत होता. याप्रमाणे उपदेश ऐकून चक्रवर्ती प्रभूंना वंदन करुन अयोध्येस गेले.

## 19

## भगवान ऋषभदेवांचे निर्वाण

भगवान ऋषभदेव आपल्या चौऱ्यांशी गणधरांसह मोक्ष मार्गाचा उपदेश देत्त विहार करीत होते. त्यांच्या संघात 84 हजार मुनिराज, साडेतीन लाख आर्यिका, तीन लाख श्रावक आणि पांच लाख श्राविका होत्या. भवंतांचे आयुष्य क्षणाक्षणाला क्षीण होत चालले होते व शारीरिक बन्धनापससून मुक्त होण्याची वेळ जवळ येत होती. जेव्हा आयुष्यमर्यादा केवळ चौदा दिवसांची राहिली तेव्हा ते कैलास पर्वतावर जाऊन विराजमान झाले.

त्याच दिवशी भरताना स्वप्न पडले. त्यांनी स्वप्नात सुमेरु पर्वत वाढत वाढत मुक्त क्षेत्रापर्यंत पोहोचलेला पाहिला. स्वर्गातून एका महाऔषधीचा वृक्ष पृथ्वीवर येऊन मानवांचा जन्ममरणरुपी रोग दूर करुन परत स्वर्गाला जाणारा. युवराज अर्ककीर्तीने आपल्या स्वप्नी

पाहिला. चक्रवर्तीच्या गृहपतींना स्वप्न पडले. त्यात एक कल्पवृक्ष मानवांना त्यांच्या इच्छेनुसार दान देऊन स्वर्गात जाण्यास तयार झालेला त्यांनी पाहिला. एक सिंह पिंजरा तोडून कैलास पर्वतावरुन उडण्याच्या तयारीत असलेला सेनापतीने आपल्या स्वप्नात पाहिला. जयकुमाराच्या अनन्तवीर्य नामक पुत्राने आपल्या स्वप्नात तीन लोकांना प्रकाशीत करुन चन्द्रमा तारांगणासहित चालला आहे असे पाहिले चक्रवर्तीच्या पट्टराणी सुभद्रेने स्वप्नात इंद्राणी, यशस्वीती आणि सुनन्देबरोबर शोकमग्न अवस्थेत बसलेली पाहिली अकम्पनाच्या चित्रांगद नांवाच्या पुत्राला स्वप्न पडले. त्याने स्वप्नात पृथ्वीला प्रकाशित करुन वर उडत चाललेल्या सूर्याला पाहिले. या प्रमाणे सर्वांनी त्या रात्री स्वप्ने पाहिली. प्रात:काली त्या सर्वांनी राजपुरोहितास त्याची फले विचारली. ही स्वप्ने भगवान ऋषभदेवांचे मोक्षगमन सुचवितात असे पुरोहिताने सांगितले.

तोच दारी एक आनन्द नामक मनुष्य भगवांतांचा समाचार घेऊन आला. त्याने म्हटले की, भगवंतांनी मौन धारण केले आहे. व सारी सभा, चित्रासारखी स्तब्ध बसलेली आहे. ही बातमी ऐकताच भरत चक्रवर्ती आपल्या आप्त परिवारगणासह कैलास पर्वतावर जाऊन पोहोचले व भगवंतांस नमस्कार करुन त्यांची स्तुती केली. तद्नंतर भरतराजे चौदा दिवस रात्रंदिवस भगतंतांची सेवा करण्यात मग्न झाले. माध कृष्ण सूर्यादयाच्या वेळी अनेक मुनिबरोबर भगवान पर्यंकसनावर विराजमान झाले. त्यांनी सूक्ष्म क्रियाप्रतिपाती नावाच्या तिसऱ्या शुक्लध्यानाने मनोयोग, वचनयोग आणि काययोगांचा निरोध चौदाव्या गुणस्थानात प्रवेश केला. व व्युपरत क्रियानिवर्ति नावाच्या चौथ्या शुक्लध्यानाने अधाति कर्माचा नाश करुन ते सर्व प्रकारच्या बंधनातून- दास्यातून- मक्त झाले. मुक्त होताच सम्यतक्त्वादी आठ गुणांनी प्रकाशमान होऊान त्यांचा शुद्ध आत्मा शरीराबाहेर निघाला व लोकाकाशाच्या अग्रभागावर जाऊान सिद्ध विराजमान झाला.

ताबडतोब मोक्ष - कल्याणिक पूजा करण्यासाठी मानव व देव एकत्र जमले. त्यांनी भगवंतांच्या शरीरास अग्निसंस्कार केला.

भवंतांच्या वियोगाने भरतराजे अतिशय शोकाकुल झाले. तेव्हा भगवंतांच्या प्रमख वृषभसेन गणधरांनी त्यांची समजूत घातली ते म्हणाले, भरतेश्वर ! या संसारात सर्व प्राण्यांचा इष्ठ व अनिष्ट वस्तूंशी संयोग होतो व शेवटी त्यांचा नाश होतो हे सारे आपण जाणत असून खेद का करता ? भगवान ऋषभदेवांनी अष्ट कर्मांचा नाश करुन मोक्ष मिळविला. ते या संसारातील रोग, शोक, जन्म, मरण, वृद्धत्व, दू:ख या सर्वातून मुक्त झाले. याचा तुम्हाला

विषाद का वाटतो ? आपल्या इष्टमित्राच्या वियोगाने दु:ख होते, कारण त्यांना पुन्हा दुसरा जन्म ध्यावा लागतो. परंतु ज्यांनी मृत्यूचाच नाश करुन नित्य निर्विकार शाश्वत जीवन मिळविले आहे, त्यांाच्यासाठी कोणते आप्तेष्ट शोक करतील ? तुमच्या मनात विचारांच्या लहरी उठत असतील ? तुम्हाला वाटत असेल की, यापुढे मला त्यांचे दर्शन घडणार नाही. त्यांचा दिव्यध्वनी आता आपल्या कानी पडणार नाही. पण असा विचार करणे जरी योग्य असले तरी त्या गोष्टी आता असम्भवनीय आहेत. तुमचा शोक व्यर्थ आहे. जे भगवान पूर्वी आपणास फक्त नेत्रांना दिसत होते ते आता आपल्या ह्दयमंदिरात विराजमान झाले आहेत. यास्तव शोक सोडा. आपणांस या संसाराचे स्वरुप तर ज्ञात आहे ! तुम्हाला ही गोष्ट माहित नाही काय ? की अनंतकालापासून भ्रमण करीत या संसारात राहणाऱ्या जीवाचे असंख्य आप्तेष्ट होऊन गेले आहेत. तेव्हा अज्ञानी जीवाप्रमाणें व्यर्थ मोहात का पडता ?

गणधरांच्या या उपदेशामृताने भरताचा शोकाग्नी शान्त झाला. त्यांनी गणधरदेवाना नमस्कार केला आणि आपल्या भोगवृष्णेची निन्दा करीत ते आपल्या नगरास परतले. आता मोह त्यांच्यापासून दूर पळत होता. मनांत आत्महित करुन घेण्याची भावता तीव्रतर होत होती . राज्यकारभाराकडे त्यांचे लक्ष लागेना. ऐहिक गोष्टीपासून ते विरक्त झाले. अर्क्कीर्तीस राज्य देऊन त्यांनी जिनदीक्षा घेतली. त्यांना लवकरच केवलज्ञान झाले. प्रथम केवळ सहा खण्डांचेच ते सम्राट होते. पण आता ते साऱ्या त्रैलोक्याचे नाथ झाले. मानवांबरोबर आता देवदेखील त्यांची पूजा करु लागले.